स्थायी समिती
दाखल विषय – दि. १०/१०/२०१७

विषय क्रमांक :– १०४१ त्वर्य

टोयाटो अल्टीस, टोयाटो इटिओस, टोयाटो करोला व फियाट लिनिया या प्रकारच्या कारची स्पेअरपार्टसह देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा २ (२) नुसार उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते/अधिकृत सर्व्हिस स्टेशन असलेल्या कंपनी यांचेकडून करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/४२२ दि.७/१०/२०१७ चे पत्र.

१. एम एच १२ आर आर ०६९३ (टोयाटो अल्टीस), एम एच १२ ए एच ९९०० (टोयाटो करोला), एम एच १२ एच झेड ९३६६ (टोयाटो अल्टीस) व एम एच १२ ए एच ८६८५ (टोयाटो इटिओस) या कार टोयाटो कंपनीचे अधिकृत विक्रेते / सर्व्हिस स्टेशन असणारे मे.वाय. एम. मोटर्स प्रा.लि., टी २७ टेल्को भोसरी रोड, बालाजीनगर, पुणे व फियाट कंपनीच्या एम एच १२ आर आर ०४१२ व एम एच १२ आर आर ०४१३ या कार फियाट कंपनीचे अधिकृत विक्रेते / सर्व्हिस स्टेशन असणारे मे.रुद्र मोटर्स, वाघोली या कंपनीकडून निरस्त होईपर्यंत आवश्यकतेनुसार स्पेअपरपार्टसह देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा २ (२) नुसार करुन घेणेस–
२. सदरचे काम टोयाटो कंपनीच्या कारसाठी मे.वाय. एम. मोटर्स प्रा.लि., टी २७ टेल्को भोसरी रोड, बालाजीनगर, पुणे व फियाट कंपनीच्या कार साठी मे.रुद्र मोटर्स, वाघोली यांचेकडून करारनामा न करता व अनामत न घेता करुन घेणेस–
३. सदर कारची देखभाल दुरुस्ती पोटी होणारे बिल मे.वाय. एम. मोटर्स प्रा.लि., टी २७ टेल्को भोसरी रोड, बालाजीनगर, पुणे व मे.रुद्र मोटर्स, वाघोली यांना ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस/ एनईएफटी याद्वारे अदा करणेस.
४. सदर कामासाठी खालील अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून पुरेशी तरतुद उपलब्ध आहे.

सन २०१७–१८
आर ई–२१ ए–१०३ ए
११. यांत्रिक क स्थापत्य अधिकारी
२ अ–सुटे भाग खर्च

विषय क्रमांक :– १०४२ त्वर्य

सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल यंत्रणा बसविणे नविन बजेट हेड या अर्थशिर्षकावर र.रुपये ५,००,००,०००/– वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनव्य/४२३ दि.७/१०/२०१७ चे पत्र.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, पथ विभाग, CE20A1264/A17-1 एकात्मिक सायकल योजना कार्यान्वित करणे	५ कोटी	----
नविन सुचवलेले काम सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल यंत्रणा बसविणे	----	५ कोटी

विषय क्रमांक :– १०४३ त्वर्य

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत डायलेसिस वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांना रक्कम रुपये १,००,०००/– पर्यंत १०० टक्के आर्थिक लाभ देणेबाबत मा.प्रदीप गायकवाड व मा.सौ.रत्नप्रभा जगताप यांचे दि. २२/८/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ६७५ दि. २९/०८/२०१७ व मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ५६ दि.२५/०६/२००९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/४२५ दि. ७/१०/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्रमांक ३ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात झोपडपटटयांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरीकांसाठी आरोग्य विम्याअंतर्गत शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना ठराव पारित झाला असून महानगरपालिकेतर्फे एका आर्थिक वर्षासाठी, एका कुटूंबासाठी रक्कम रुपये १,००,०००/– या

कमाल मर्यादेपर्यंत पॅनेलवरील खाजगी रुग्णालयांमधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारार्थ आर्थिक लाभ देण्यात येतो.

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या व डायलेसिस हा वैद्यकीय उपचार चालू असणाऱ्या रुग्णांना, योजनेअंतर्गत रक्कम रुपये १,००,०००/–पैकी रक्कम रुपये २५,०००/–पर्यंत १०० टक्केचे हमीपत्र संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे देण्यात येते. म्हणजेच, रक्कम रुपये २५,०००/– पर्यंत प्रत्येक डायलेसिस उपचारांचे वैद्यकीय बीलाची रक्कम रुग्णास खाजगी रुग्णालय प्रशासनास अदा करावी लागत नसून शहरी गरीब योजनेअंतर्गत संपूर्ण बील सी.जी.एच.एस.दरपत्रकानुसार संबंधित हॉस्पिटल प्रशासनास अदा करण्यात येते.

तदनंतर, म्हणजेच रक्कम रूपये १,००,०००/– पैकी रक्कम रुपये २५,०००/– पूर्णतः संपलेवर, रक्कम रुपये ७५,०००/–पर्यंत ५० टक्केचे हमीपत्र संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे रुग्णाचे डायलेसिस उपचारांसाठी देण्यात येते. सदर ५० टक्केचे हमीपत्रांतर्गत, प्रत्येक डायलेसिस उपचाराचे अंतिम बीलापैकी ५० टक्के रक्कम खाजगी रुग्णालय प्रशासनास रुग्णांना अदा करावी लागते. खाजगी रुग्णालय प्रशासनाकडून उर्वरीत ५० टक्के रक्कमेचे बील शहरी गरीब योजना कार्यालयात आवक झाल्यावर सी.जी.एच.एस.दरपत्रकानुसार तपासले जाऊन रुग्णालयास संबंधित रक्कम अदा करण्यात येते.

तथापी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्रमांक २ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार, शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या, पॅनेलवरील खाजगी रुग्णालयांमध्ये डायलेसिस हा वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी, योजनेची कमाल मर्यादा रक्कम रुपये १,००,०००/–पर्यंत, संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे १०० टक्केचे हमीपत्र देऊन, जनरल वॉर्डच्या सी.जी.एच.एस.मान्य दराने, एकूण बीलाच्या १०० टक्के प्रमाणे संपूर्ण रक्कम संबंधित रुग्णालय प्रशासनास अदा करून आरोग्य सेवेचा लाभ देणेसाठी मान्यता द्यावी

विषय क्रमांक :– १०४४ त्वर्य

प्रभाग क्र. ६० ब मध्ये भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय व अरुण कुमार वैद्य स्टेडियम अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पवन क्रिक सर्व्हिसेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७४,९९,९३६/– पेक्षा ०.०९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,९३,१८६=०६ पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४३४ दि.९/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०४५ त्वर्य

प्रभाग क्र. ४५ अ कै .दशरथ बाळोबा भानगिरे आरोग्य केंद्र येथे वाढीव इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अभिजीत एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,५२,४६,९७६/– पेक्षा २०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२१,९७,५८०=८० पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/४३५ दि.१०/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०४६ त्वर्य

पुणे शहर घोरपडी पेठ मोमीनपुरा येथील कब्रस्थानमध्ये आर.सी.सी.कॉलम, पाथवे, बीम, फुटींग मध्ये कब्रस्थानचे काम करणे तसेच कास्टींग ऑफ कॉलम इन एम २० ग्रेड कॉंक्रीट विथ शटरींग एक्सेट्रा कम्प्लींट काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दरवेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,२९,९७४/– पेक्षा २०.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,४३,४८६=२० पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/४३६ दि.१०/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०४७ त्वर्य

महापालिका सहाय्यक आयुक्त बिबवेवाडी कार्यालयाअंतर्गत पडिक हद्दीतील स्वच्छतेसाठी झाडणकाम करणेसाठी दैनंदिन १३८ कामगार पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९२,६३,६९०=५५ पेक्षा ८.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून (सुधारित) टेंडर दरानुसार र.रु.९२,६३,६९०=५५ अथवा उपलब्ध तरतुदीपर्यंत दि.८/९/२०१७ पासून काम

सुरु करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/बिबवे.क्षे.का./४३७ दि.१०/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०४८ त्वर्य

येरवडा क्षेत्रिय महा.सहा.आयुक्त कार्यालयांतर्गत पडीक हद्दीतील स्वच्छतेसाठी बिट्सनुसार झाडणकाम करणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री एन्टरप्रायजेस व मे.श्री.गणेश एंन्टरप्रायजेस यांनी समान दराने निविदा भरली (टेंडर र.रु.९५,९९,९३८=५९ पेक्षा १०.००% जास्त) असल्याने मे.श्री एन्टरप्रायजेस यांना रक्कम रुपये ५२,७९,९६६=२२ व मे.श्री.गणेश एंन्टरप्रायजेस यांना रक्कम रुपये ५२,७९,९६६=२२ यांना विभागून एकूण र.रु.१,०५,५९,९३२=४४ सर्व शुल्कासह काम करुन घेण्यास व दि. १५ जुलै २०१७ पासूनचे वेतन अदा करणेस व करार रकमेपर्यंत काम करुन घेणेस त्यापोटी त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/येरवडा–कळस–धानोरी/४३९ दि.१०/१०/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०४९ त्वर्य

मा.जयंत भावे यांचे दि. ६/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१३ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २), पान क्र.५५, अ.क्र.२३६, प्रभाग क्र. १३ ड प्रितमनगर येथील ड्रेनेज लाईन टाकणे	१० लाख	---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.१३ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे	---	१० लाख

विषय क्रमांक :– १०५० त्वर्य

मा.जयंत भावे यांचे दि. ६/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१३ ड देशपांडे पुरम, पौड फाटा रस्ता डांबरीकरण करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०२, अ.क्र. १६, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र. १७९, अ.क्र. २१६, प्रभाग क्र. १३ ड देशपांडे पुरम, पौड फाटा रस्ता काँक्रीटीकरण करणे.	२० लाख	---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.१३ ड देशपांडे पुरम, पौड फाटा रस्ता डांबरीकरण करणे	---	२० लाख

विषय क्रमांक :– १०५१ त्वर्य

मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. ६/१०/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या स्वातंत्र्य सेनानी गंगाराम कर्णे हॉस्पिटल पुणे येथे गरीब व गरजू रूग्णांना डायलेसिसची सुविधा अल्प दरामध्ये पुणे मनपा व स्वर्गीय नाना पालकर स्मृती समिती ,पुणे यांचे समवेत संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्प राबविणेसाठी खालीलप्रमाणे मान्यता द्यावी.

सध्या शहरामध्ये मधुमेह व हृदय रोगाचे रूग्ण मोठया प्रमाणावर आढळून येत असून त्यामुळे किडनीचे आजार वाढत असून सदर रूग्णांचे कालांतराने मुत्रपिंड काम करत नाही.अशा रूग्णांना आवश्यकतेनुसार आठवडयातुन किमान एकदा डायलेसिसची आवश्यकता भासते व यासाठी दिड ते दोन हजार रूपये खर्च येतो. गरीब रूग्णांना हा खर्च परवडत नाही त्यामुळे ससून सारख्या रूग्णालयाचा आधार घ्यावा लागतो. ससून रूग्णालयाच्या क्षमतेपेक्षा रूग्णांची संख्या जास्त असल्यामुळे गरीब व गरजू रूग्णांना उपचार घेणे अडचणीचे होते याचा विचार करून पुणे महानगरपालिकेतर्फे गरीब व गरजू रूग्णांना डायलिसिसची सुविधा अल्पदरात उपलब्ध करून देणेकामी सध्या कमला नेहरू रूग्णालय येथे लायन्स कल्ब ऑफ मुकुंद नगर चारीटेबल ट्रस्ट व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्प ऑक्टोबर २०१५ पासून

कार्यान्वित करण्यात आला आहे. या संयुक्त प्रकल्पा अंतर्गत प्रति रूग्ण र.र.४००/- इतक्या अल्प दरामध्ये डायलेसिसची सुविधा नागरीकांना पुरविण्यात येते.आता पर्यत सुमारे १२०० रूग्णांनी या सेवेचा लाभ घेतलेला आहे.पुणे महानगरपालिकेने एरंडवणा दवाखाना,जनता वसाहत दवाखाना येथे संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्प चालविणे करीता निविदा प्रक्रिया राबविली होती परंतु अनेकवेळा मुदतवाढ देऊनही सदरची निविदा कोणीही भरली नाही. यामुळे वरील सर्व ठिकाणच्या निविदा रद्द कराव्या लागल्या.

पुणे मनपा क्षेत्रातील नागरीक अल्प दरातील डायलेसिस सुविधेपासून वंचित राहु नयेत म्हणून सध्या कमला नेहरू रूग्णालय येथे सुरू असलेल्या पुणे महानगरपालिका व लायन्स कल्ब ऑफ मुकुंद नगर चारीटेबल ट्रस्ट पुणे डायलेसिस प्रकल्पाच्या धर्तीवर स्वातंत्र्य सेनानी गंगाराम कर्णे हॉस्पिटल येथे स्वर्गीय नाना पालकर स्मृती समिती ,पुणे व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डायलेसिस प्रकल्पास पाच वर्षा करीता डायलेसिस प्रकल्प चालविण्यास दिल्यास पुणे मनपा क्षेत्रातील नागरीकांना मोठया प्रमाणावर फायदा होईल.या प्रकल्पाकरीता स्वर्गीय नाना पालकर स्मृती समिती , पुणे यांना पहिल्या व दुस-या मजल्यावरील अंदाजे १५०० चौ.फुट जागेमध्ये ८ डायलेसिस मशिन सदर संस्थेमार्फत कार्यान्वित करण्यात येतील याकरीता आवश्यक कुशल व अकुशल मनुष्यबळ ,डायलेसिस मशिन सदर संस्थेमार्फत पुरविण्यात येईल यासाठी पुणे महानगरपालिकेला कोणतीही आर्थिक तोषिश सहन करावी लागणार नाही. डायलेसिस करीता आवश्यक कन्झुमेबल रूग्णांकडून घेण्यात येईल प्रति रूग्ण प्रति डायलेसिस र.रू ४००/- इतका दर आकारण्यात यईल .

सदर जागा वापरापोटी स्वर्गीय नाना पालकर स्मृती समिती ,पुणे यांचेकडून कोणतेही भाडे आकारू नये.डायलेसिस प्रकल्पासाठी आवश्यक वीज व पाणीपुरवठा व्यवस्था मनपा मार्फत करण्यात यावी.

मा.आरोग्य प्रमुख यांनी लेखी शिफारस केलेल्या रूग्णांना डायलेसीससाठी कोणतीही फी आकारणी करण्यात येणार नाही.मोफत डायलेसीस रूग्णांची संख्या २ ते ३ पेक्षा जास्त नसावी ही संख्या वाढल्यास संस्थेवर अधिक आर्थिक बोजा पडेल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच स्वर्गीय नाना पालकर स्मृती समिती ,पुणे ही संस्था सदर ठिकाणी व येरवडा परिसरातील सर्व झोपडपटटी भागामध्ये लसीकरण ,जनजागृती मोहीम ,दैनंदीन आरोग्य सेवा ,सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प ,होम नर्सिग कोर्स पुरविण्यास तयार आहे तरी वरील प्रकल्पास मान्यता देण्यास

विषय क्रमांक :- १०५२ त्वर्य

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. ७/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१९ क मध्ये विविध विकास कामे (पथ विभाग, पोलार्ड बी-२ पध्दत) करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३४, अ.क्र.२७४, प्रभाग क्र. १९ क, हरकादास शाळा अल्युमिनियम कम्पोसिट पनेलिंग बेंचेस बसविणे	२० लाख	---
नवीन सुचविलेले काम		
प्रभाग क्र.१९ क मध्ये विविध विकास कामे (पथ विभाग, पोलार्ड बी-२ पध्दत) करणे	---	२० लाख

विषय क्रमांक :- १०५३ त्वर्य

मा.सौ.मनिषा कदम यांचे दि. ७/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३८ क मधील उत्कर्ष सोसायटी येथे नविन डी.पी.रोड विकसित करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र.१५६, प्रभाग क्र. ३८ क मध्ये भारतनगर येथे ग्राऊंड करणे	१० लाख	---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.३८ क मधील उत्कर्ष सोसायटी येथे नविन डी.पी.रोड विकसित करणे	---	१० लाख

विषय क्रमांक :– १०५४ त्वर्य

मा.राजेश बराटे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३१ ड कर्वेनगर सम्राट अशोक विद्यामंदिर येथे नवीन इमारत विकसित करणे (बांधणे) साठी र.रू.७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १)१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२४०, अ.क्र.५६१, प्रभाग क्र. ३१ ड कामना वसाहत कर्वेनगर येथील समाजमंदिराचा दुसरा मजला बांधणे २) १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०२, अ.क्र. १, शहरामधील चौकांची सुधारणा/विकासकामे करणे, (यादी क्र. एसटी१), पान क्र. १९३, अ.क्र. ४१, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर मध्ये मुख्य चौकात मास्टीक अस्फाल्ट करणे ३) ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २६३, अ.क्र. १७९, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर मधील सुलभ शौचालयांची दुरुस्ती करणे	२५ लाख ३० लाख २० लाख	--- --- ---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.३१ ड कर्वेनगर सम्राट अशोक विद्यामंदिर येथे नवीन इमारत विकसित करणे (बांधणे)	---	७५ लाख

विषय क्रमांक :– १०५५ त्वर्य

मा.आनंद आलकुंटे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२४ क मध्ये शंकरमठ येथील नियोजित उद्यानास सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	**कमी**	**अधिक**
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४५,अ.क्र.९७, प्रभाग क्र.२४ क राम मनोहर लोहिया उद्यानात ओपन जिमचे साहित्य पुरविणे	१० लाख	---
<u>नविन सुचविलेले काम</u> प्रभाग क्र.२४ क मध्ये शंकरमठ येथील नियोजित उद्यानास सिमाभिंत बांधणे	--- ---	 १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवाशावर सदर ठरावाची कार्यवाही मा.महा.आयुक्त यांनी करावी.

विषय क्रमांक :– १०५६ त्वर्य

मा.आनंद आलकुंटे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२४ क मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	**कमी**	**अधिक**
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक १) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३५, अ.क्र.३३५, प्रभाग क्र.२४ पालखी मार्गावर विविध विकास कामे करणे. २) ७.आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १९, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह / विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२२५, अ.क्र.४०, प्रभाग क्र.२४ क येथे सरकारी दवाखाना उभारणे	२० लाख २० लाख	--- ---
<u>नविन सुचविलेली कामे</u> १)प्रभाग क्र.२४ क मध्ये हेवन पार्क गल्ली नं.८ व ९ येथे कॉक्रीटीकरण करणे.	--- ---	 १० लाख

२) प्रभाग क्र.२४ क मध्ये हेवन पार्क गल्ली नं.१० व ११ येथे कॉक्रीटीकरण करणे.	---	१० लाख
३) प्रभाग क्र.२४ क मध्ये हेवन पार्क गल्ली नं.१२ येथे कॉक्रीटीकरण करणे.	---	१० लाख
४) प्रभाग क्र.२४ क मध्ये हेवन पार्क गल्ली नं.ब-३ व ब-४ येथे कॉक्रीटीकरण करणे.	---	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवाशावर सदर ठरावाची कार्यवाही मा.महा.आयुक्त यांनी करावी.

विषय क्रमांक :- १०५७ त्वर्य

मा.आदित्य माळवे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ७क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक		
१)२. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२१, अ.क्र.२७,प्रभाग क्र. ७क मधील वीरबाजी प्रभू शाळा सुशोभिकरण करणे व दुरुस्ती करणे.	१० लाख	---
१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०),		
२)पान क्र.२३०, अ.क्र.८९, प्रभाग क्र. ७क ,कस्तुरबा वसाहत मधील जाणाऱ्या रस्त्यावर स्वागत कमान उभारणे.	१५ लाख	---
३)पान क्र.२३०, अ.क्र.९०, प्रभाग क्र. ७क,वैदूवाडी मधील जाणाऱ्या रस्त्यावर स्वागत कमान उभारणे.	१५ लाख	---
४) १८.सांस्कृतिक केंद्रे, पान क्र. ११२, अ.क्र.१, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी एसजे १६), पान क्र.२४८ अ.क्र.७, प्रभाग क्र. ७क, मध्ये गणेशखिंड रोडवरील चाफेकर स्मारकाचे सुशोभिकरण करणे	३० लाख	---
५) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एसए १०), पान क्र. १७४, अ.क्र.१८,प्रभाग क्र. ७क ,सेनापती बापट रस्त्यावर स्ट्रीट फर्निचर करणे.	२० लाख	---
६) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०),पान क्र. २३०, अ.क्र.९२, प्रभाग क्र. ७क मधील ईश्वर कृपा सोसायटी मुळारोड येथील नदीशेजारी सीमा भिंत बांधणे	१० लाख	---
<u>नविन सुचविलेली कामे -</u>		
१) प्रभाग क्र. ७क मध्ये वेताळबाबा चौकास डिजिटल कर्विंग बसविणे.	---	१० लाख
२) प्रभाग क्र. ७क मध्ये सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल मॅरिएट चौकास डिजिटल कर्विंग बसविणे.	---	१० लाख
३) प्रभाग क्र. ७क मध्ये स्मार्ट बसस्टॉप उभारणे .	---	१२.५ लाख
४) प्रभाग क्र. ७क मध्ये विविध पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे.	---	५ लाख
५) प्रभाग क्र. ७क मध्ये विविध ठिकाणी डेकोरेटिव्ह पोल उभारणे .	---	१५ लाख
६) प्रभाग क्र. ७क मध्ये विविध भागात अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे,पेव्हींग ब्लॉक बसविणे व फरशी बसविणे.	---	१५ लाख
७) प्रभाग क्र.७क मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन जेटिंग व ग्रॅब मशिनच्या सहाय्याने साफ करणे	---	१० लाख
८) प्रभाग क्र. ७क मध्ये खैरेवाडी व विजय हौ. सोसायटीला लागून असलेल्या मैदानावर विविध विकास कामे करणे .	---	५ लाख
९) प्रभाग क्र. ७क मध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक व नाम फलक उभारणे	---	७.५ लाख
१०)प्रभाग क्र. ७क मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे	---	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी .

विषय क्रमांक :- १०५८ त्वर्य

मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.७ ब मध्ये गजानन महाराज उदयानात हार्टिकल्चर विषयक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. ११२, अ.क्र. ८, शहरामध्ये भाजी मंडई बांधणे/भाजी मंडईमध्ये विकास कामे करणे (यादी एसजे २९), पान क्र.२४९, अ.क्र.३, प्रभाग क्र.७ ब मध्ये बी.डी. किल्लेदार मार्केट मध्ये दुरूस्ती कामे करणे	१० लाख	---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.७ ब मध्ये गजानन महाराज उद्यानात हार्टिकल्चर विषयक कामे करणे	---	१० लाख

विषय क्रमांक :- १०५९ त्वर्य

मा.सौ.मंजुश्री खर्डेकर यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१३ क मध्ये महिला बचत गटाच्या विक्री केंद्राकरिता विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २६१, अ.क्र.६१, प्रभाग क्र. १३ क मध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणे	१० लाख	---
नवीन सुचविलेले काम		
प्रभाग क्र.१३ क मध्ये महिला बचत गटाच्या विक्री केंद्राकरिता विविध विकास कामे करणे	---	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- १०६० त्वर्य

मा.सौ.अनुसया चव्हाण यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३६ अ मध्ये विविध ठिकाणी विकास कामे करणेसाठी र.रू.५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३९, अ.क्र.४९२, प्रभाग क्र. ३६ अ बिबवेवाडी येथील वाचनालयात पुस्तके खरेदी करणे.	५ लाख	---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.३६ अ मध्ये विविध ठिकाणी विकास कामे करणे	---	५ लाख

विषय क्रमांक :- १०६१ त्वर्य

मा.प्रविण चोरबेले व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. ९/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१५ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १.७५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), १)पान क्र.२१३, अ.क्र.५, प्रभाग क्र.१५ क अष्टभुजा ते पुलाची वाडी दुचाकी पादचारी पूल बांधणे २) पान क्र.२१३, अ.क्र.६, प्रभाग क्र.१५ क मध्ये पटवर्धन समाधी ते वृध्देश्वर सिध्देश्वर मंदिर दुचाकी व पादचारी पूल बांधणे	१ कोटी ७५ लाख	--- ---
नविन सुचविलेली कामे		

१)प्रभाग क्र. १५ क क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मल:निसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेसाठी (सक्शन जेटिंग सह रिसायकलिंग मशिनद्वारे)	---	७५ लाख
२)प्रभाग क्र. १५ क मधील जैव कचरा विशुध्दीकरण करणेसाठी यंत्र बसविणे	---	२५ लाख
३)प्रभाग क्र. १५ क मधील जैव कचरा विशुध्दीकरण करणेसाठी यंत्र बसविणे	---	७५ लाख

विषय क्रमांक :– १०६२ त्वर्य

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कात्रज चौकातील इमारतीमध्ये लिफ्ट पुरविणे व बसविणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
१	सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. ५९, बजेट कोड–आरई१७एफ२०१ प्रभाग क्र. २८ ब येथील वस्ती व झोपडपटट्रीमधील नागरिकांच्या संसर्ग व असंसर्ग रोग व लॅब तपासणीकरिता.	२० लाख	–––
	नवीन सुचविलेले कामे		
१	कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कात्रज चौकातील इमारतीमध्ये लिफ्ट पुरविणे व बसविणे.	–––	२० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– १०६३ त्वर्य

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २८ ब मध्ये गार्डन कटिंग उचलणेकरिता टिपर खरेदी करणेसाठी र.रू.१८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
१	सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, खास निधीतून करावयाची योजनांतर्गत कामे, ७. यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री, पान क्र. १४७, यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री, (यादी क्र.एसवाय १), पान क्र. २६६, अ.क्र.२६, प्रभाग क्र. २८ ब मध्ये आरोग्यसाठी ॲम्ब्यूलन्स् खरेदी करणे.	१० लाख	–––
२	पान क्र. २६६, अ.क्र.२७, प्रभाग क्र. २८ ब मध्ये बकेट व ढकलगाडी खरेदी करणे.	०८ लाख	–––
	नवीन सुचविलेले काम		
१	प्रभाग क्र. २८ ब मध्ये गार्डन कटिंग उचलणेकरिता टिपर खरेदी करणे.	–––	१८ लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– १०६४ त्वर्य

मा.मारुती (नाना) सांगडे व मा.अनिल (बॉबी) टिंगरे यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र. २५३, अ.क्र.२, प्रभाग क्र. १ ब (कळस–धानोरी) मधील उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे	३० लाख	---

नविन सुचविलेली कामे १)प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील गणेशनगर येथील रस्ते डांबरीकरण करणे १)प्रभाग क्र. १ ब मधील कळस-धानोरी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे २)प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील विविध रस्ते डांबरीकरण करणे	--- --- ---	 १० लाख १० लाख १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- १०६५ त्वर्य

मा.सचिन दोडके यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३२ ड मध्ये वारजे हायवे चौक ते शिवणे रस्ता विकसित करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०२, अ.क्र. १६, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१८५, अ.क्र.५२१, प्रभाग क्र.३२ ड खान वस्ती परिसरात रस्ते काँक्रीटीकरण करणे. २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३८, अ.क्र.४४३, प्रभाग क्र.३२ ड न्यु अहिरेगाव सुशोभिकरण करणे. १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २) ३) पान क्र.१६३, अ.क्र.३९७, प्रभाग क्र.३२ ड पॉप्युलर नगर मधील डीपी रस्ता डांबरीकरण करणे. ४) पान क्र.१६३, अ.क्र.३९६, प्रभाग क्र.३२ ड आदित्य गार्डन रस्ता डांबरीकरण करणे.	 १० लाख १० लाख १० लाख २० लाख	 --- --- --- ---
नवीन सुचविलेले काम		
प्रभाग क्र.३२ ड मध्ये वारजे हायवे चौक ते शिवणे रस्ता विकसित करणे	---	५० लाख

विषय क्रमांक :- १०६६ त्वर्य

मा.मारुती तुपे व मा.योगेश समेळ यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२३ ड मधील काळे-बोराटेनगर येथील स.नं.४२अ/६ब येथे दवाखाना विकसित करणेसाठी र.रू.४५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १) ७.आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १९, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह / विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२२५, अ.क्र.३८, प्रभाग क्र. २३ ड मध्ये दवाखाना विकसित करणे २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र. २३५, अ.क्र. ३२७, प्रभाग क्र. २३ ड मध्ये स.नं.१३ सातववाडी बापुजी बुवा समाजमंदिर नविन बांधणे ३) १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२१३, अ.क्र.१४, प्रभाग क्र.२३ ड कामठे वस्ती येथील गरुड वस्ती ते रामोशी आळी कॅनॉलवर लोखंडी पूल बांधणे	 २० लाख १५ लाख १० लाख	 --- --- ---
नवीन सुचविलेले कामे		
प्रभाग क्र.२३ ड मधील काळे-बोराटेनगर येथील स.नं.४२अ/६ब येथे दवाखाना विकसित करणे	---	४५ लाख

विषय क्रमांक :– १०६७ त्वर्य

मा.प्रिया गदादे व मा.अनिल टिंगरे यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २२११ दि. २६/२/२०१५ चा फेरविचार करण्यात येवून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात यावी.

(पुणे महानगरपालिका मुख्य भवन येथे विस्तारीत इमारतीचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.के.आर.ट्रेडर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,१०,७९,३५८/– पेक्षा ०७.०७% कमी) असल्याने त्यांचेकडून टेंडर र.रु.२६,१०,७९,३५८/– अधिक टेंडर अटी शर्तींमधील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या संभाव्य कमी किंवा अधिक रकमेपर्यत काम करून घेणेस व त्यापोटी त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत)

विषय क्रमांक :– १०६८ त्वर्य

पुणे महानगरपालिकेचे वतीने आयोजित करणेत येणा–या श्री गणेशोत्सव स्पर्धेच्या पारितोषिकांबाबत झालेला मा. मुख्य सभा ठराव क्र. ५९२ दि. २१/१/२०१३ हा ठराव निरस्त करणेस तसेच त्या ऐवजी खालील प्रमाणे नविन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. ४/१०/२०१७ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभेचा दि.४/१०/२०१७ चा निर्णय विचारासाठी.

शहर पातळीवर स्थानिक देखावा पुरस्कार

प्रथम पुरस्कार – ७५०००/–
द्वितीय पुरस्कार – ५१०००/–
तृतीय पुरस्कार – ३५०००/–

स्थानिक उत्तेजनार्थ पुरस्कार

१) **पूर्व विभाग –** प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

२) **पश्चिम विभाग –** प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

३) **उत्तर विभाग –** प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

४) **दक्षिण विभाग –** प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

५) **मध्य पेठा विभाग –** प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

शहर पातळीवर सर्वोत्कृष्ट सजावट

प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

शहर पातळीवर सर्वोत्कृष्ट सामाजिक कार्य

प्रथम पुरस्कार – ३१०००/–
द्वितीय पुरस्कार – २१०००/–
तृतीय पुरस्कार – १५०००/–

विषय क्रमांक :– १०६९ त्वर्य

शीख समाजातील सामाजिक काम करणाऱ्या एका व्यक्तीस दरवर्षी गुरु गोविंदसिंगजी साहब यांचे नावे पुरस्कार देण्यास तसेच पुणे महानगरपालिकेच्या वतीने सत्कार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेता यांचे दि. ४/१०/२०१७ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभेचा दि.४/१०/२०१७ चा निर्णय विचारासाठी.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.